Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 275 – 279
DOI: 10.5281/zenodo.10121663

**Original Research Article**

# महात्मा गांधीजींच्या रामराज्य संकल्पनेची आजच्या काळातील उपयुक्तता

प्रा. डॉ. संतराम प्रभाकर मुंडे

विभाग प्रमुख, लोकप्रशासन विभाग, संजीवनी महाविद्यालय, चापोली ता. चाकूर जि. लातूर ४१३५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: santrammundhe@gmail.com

Received: 17 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 27 October, 2023

## प्रस्तावना

मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरात मधील पोरबंदर या गावी झाला. गांधीजी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते होते.तसेच ते महान तत्त्वज्ञ होते. महात्मा गांधीजी एक वकील होते. वसाहतविरोधी राष्ट्रवादी नेते आणि राजकीय नैतिकतावादी होते. ब्रिटीश राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या यशस्वी मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी महात्मा गांधींनी अहिंसक आंदोलनाचा वापर केला. स्वातंत्र्याचे आंदोलन करत असताना गांधीजींनी सत्याग्रह हे एक हत्यार ब्रिटिश राजवटी विरोधी वापरल्याचे दिसून येते. नंतर जगभरातील अनेक नागरी हक्क आणि स्वातंत्र्य चळवळींना महात्मा गांधींकडून प्रेरणा मिळाली. महात्मा या शब्दाचा (संस्कृत मध्ये अर्थ "महान आत्मा") असा आहे. त्यांचा सन्माननीय उल्लेख प्रथम दक्षिण आफ्रिकेत १९१४ मध्ये केला गेला. आता हा शब्द जगभरात त्यांच्यासाठी वापरला जातो.

गुजरातमधील एका हिंदू कुटुंबात जन्मलेल्या महात्मा गांधींनी इनर टेंपल, लंडन येथे वकिलीचे शिक्षण घेतले. जून १८९१ मध्ये, वयाच्या २२ व्या वर्षी त्यांना वकिली व्यवसायासाठी दक्षिण आफ्रिकेत बोलावण्यात आले. भारतात दोन अनिश्चित वर्षे राहिल्यानंतर, ते १८९३ मध्ये दक्षिण आफ्रिकेत एका भारतीय व्यापाऱ्याच्या दाव्यासाठी गेले. गांधीजी २१ वर्षे दक्षिण आफ्रिकेत राहिले.गांधीनीअसहकार आणि अहिंसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग प्रथम दक्षिण आफ्रिकेत केला. गांधीजी १९१५ मध्ये, वयाच्या ४५ व्या वर्षी, भारतात परतले. गांधीनी लवकरच अन्यायकारक जमीनकर आणि भेदभावाच्या विरोधात शेतकरी, कामगार याआणि शहरी मजुरांना आंदोलन करण्यासाठी संघटित करण्याचे ठरविले.

इ.स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे महात्मा गांधीजी कडे आली. काँग्रेसची धुरा सांभाळत असताना गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन, स्त्रियांचे समान हक्क, सर्व-धर्म-समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधींनी भारतातील ग्रामीण गरिबांची ओळख म्हणून स्वतः कातलेल्या सुताचे धोतर आणि शाल अशी साधी राहणी स्वीकारली. त्यांनी शाकाहाराचा अवलंब केला आणि अनेकदा आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. ते एका स्वयंपूर्ण निवासी समुदायात राहू लागले आणि साधे अन्न खाऊ लागले. गांधी हे आजीवन साम्प्रदायीकातावादाचे (सम्प्रदायांवर राजकारण करण्याचे) विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहोचले. ढासाळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला, आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ.स. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे ४०० कि.मी. (२५० मैल) लांब दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. इ.स. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात आणि दक्षिण आफ्रिकेत अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला.

धार्मिक बहुलवादावर आधारित स्वतंत्र भारताच्या गांधींच्या दृष्टिकोनाला १९४० च्या दशकाच्या सुरुवातीला मुस्लिम राष्ट्रवादाने आव्हान दिले; ज्याने ब्रिटिश भारतातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र मातृभूमीची मागणी केली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये, ब्रिटनने स्वातंत्र्य दिले, परंतु ब्रिटीश भारतीय साम्राज्य हे दोन अधिराज्यांमध्ये विभागले गेले, एक हिंदू-बहुल भारत आणि मुस्लिम-बहुल पाकिस्तान. अनेक विस्थापित हिंदू, मुस्लीम आणि शीख त्यांच्या नवीन भूमीत जात असताना, विशेषतः पंजाब आणि बंगालमध्ये धार्मिक हिंसाचार सुरू झाला. स्वातंत्र्याच्या अधिकृत उत्सवापासून दूर राहून, गांधींनी पीडित भागांना भेट दिली आणि त्रास कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरच्या काही महिन्यांत त्यांनी धार्मिक हिंसाचार थांबवण्यासाठी अनेक उपोषणे केली. यातील शेवटचे उपोषण हे १२ जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत सुरू केले जेव्हा ते ७८ वर्षांचे होते. यामागे पाकिस्तानला देय असलेली काही रोख संपत्ती भरण्यासाठी भारतावर दबाव आणण्याचे अप्रत्यक्ष लक्ष्य देखील होते.

भारत सरकारने धार्मिक दंगलखोरांप्रमाणेच माघार घेतली असली तरी, पाकिस्तान आणि भारतीय मुस्लिम, विशेषतः दिल्लीत वेढा घातल्या गेलेल्या, त्यांच्या बचावासाठी गांधीजी आग्रही होते, असा विश्वास भारतातील काही हिंदूंमध्ये पसरला. यापैकी एक नथुराम गोडसे हा पश्चिम भारतातील हिंदू राष्ट्रवादी होते. ३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत एका आंतरधर्मीय प्रार्थना सभेत महात्मा गांधींच्या छातीत तीन गोळ्या झाडून हत्या केली गेली.

**राम राज्याची संकल्पना**

'रामराज्य' ही संकल्पना आपल्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य घटक आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. रामराज्याची स्थापना हा आदर्श पुढे ठेवूनच महात्मा गांधींच्या नेतृत्वात स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या नेत्यांपासून तर स्वातंत्र्योत्तर काळात निवडणुका लढविणाऱ्या नेत्यांपर्यंत प्रत्येकाने राजकारण केले आहे.

१९ सप्टेंबर, १९२९च्या 'यंग इंडिया'मध्ये महात्मा गांधी लिहितात, 'मी रामराज्याचा अर्थ हिंदू राज्य असा समजत नाही. रामराज्य हे देवाचे राज्य आहे, असे मी मानतो. माझ्यासाठी राम आणि रहीम हे दोन्हीही एक आणि सारखेच आहेत; सत्य आणि सद्गुणांव्यतिरिक्त मी दुसऱ्या कुठल्याही देवाला मानत नाही. माझ्या कल्पनेतील राम या पृथ्वीतलावर खरोखरच होऊन गेला का, हे मला माहिती नाही. परंतु, रामायण हे खऱ्या लोकशाहीचे असे उदाहरण आहे, जिथे लांबलचक आणि महागड्या प्रक्रियांना सामोरे न जातासुद्धा समाजातील शेवटच्या नागरिकाला न्याय मिळू शकतो.' २ ऑगस्ट, १९३४च्या 'आनंद बाजार पत्रिका' मध्ये गांधीजी लिहितात, 'माझ्या स्वप्नातील रामायणात राजपुत्र आणि रंक या दोघांनाही समान अधिकारांची खात्री दिली जाते.' २ जानेवारी, १९३७ च्या 'हरिजन'मध्ये ते म्हणतात, 'राजकीय स्वातंत्र्य मिळवणे याचा अर्थ आपण ब्रिटिशांचे हाऊस ऑफ कॉमन्स, रशियन राज्यव्यवस्था, इटलीतील फॅसिस्ट अथवा जर्मनीतील नाझी शासन व्यवस्थेचे अनुकरण करावे, असा नाही. आपल्याला आपले, आपले वाटणारे (राज्य हवे) मी त्याला रामराज्य म्हणतो, म्हणजेच नागरिकांच्या नैतिकतेवर आधारलेले राज्य.' गांधीजींच्या मते, रामराज्याची राजकीय व्याख्या, 'धर्म, शांतता, सौहार्द आणि लहान-मोठे, उच्च-नीच, सर्व प्राणिमात्र आणि पृथ्वीच्यासुद्धा आनंदाचा विचार करून वैश्विक जाणिवेवर आधारलेले राज्य' अशी करता येईल.

मात्र, देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या दोन महिने आधी, १ जून १९४७ रोजी गांधीजींनी 'हरिजन' मध्ये लिहिले, 'ऐश्वर्यात लोळणारे काही लोक आणि पुरेसे अन्नही न मिळणारे सामान्य नागरिक अशा अन्यायकारक असमानतेच्या काळात रामराज्य अस्तित्वात येणे शक्य नाही.'

स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद आणि फाळणीच्या काळात उफाळलेला अनपेक्षित हिंसाचार यामुळे देशातील राजकीय नेत्यांचा भर रशियन विचारधारेवर आधारित धर्मनिरपेक्ष आणि समाजवादी भारत निर्माण करण्याकडे राहिला. पुढील काही दशकांत अतिउत्साही धर्मनिरपेक्ष राजकीय नेत्यांनी अध्यात्मिक आणि धार्मिक संदर्भाकडे दुर्लक्ष करत रामराज्य ही संकल्पना प्रतीकात्मक रूपाने वापरली.

अयोध्येतील बाबरी मशिदीच्या पतनानंतर सत्तेत आलेल्या विशिष्ट राजकीय विचारसरणीच्या नेत्यांमुळे अयोध्येत राम मंदिराचे पुनर्निर्माण या मुद्द्याला अचानक अधिक महत्त्व दिले गेले. जागेच्या मालकीचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित असला तरी राम मंदिर निर्मितीसाठीच्या महत्त्वाकांक्षी आणि तपशीलवार योजनांच्या घोषणा सातत्याने होत असतात. राम मंदिराची निर्मिती आणि देशात रामराज्याची स्थापना करण्याची शपथ नागरिकांना देण्यासाठी फेब्रुवारी, २०१८ मध्ये विश्व हिंदू परिषदेने अयोध्येतून ४१ दिवसांची यात्रा काढली.

आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, गांधींजींच्या हौतात्म्याला ७१ वर्षे झाल्यानंतर राम मंदिर निर्मितीच्या मागणीने देशातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा ढवळून निघाले आहे. राम मंदिर निर्मितीची आकांक्षा बाळगण्यात काहीही गैर नसले तरी केवळ एक मंदिर बांधल्याने किंवा एका मूर्तीमुळे गांधीजींच्या स्वप्नातील रामराज्य खरोखरच अस्तित्वात येऊ शकेल का, हा प्रश्न आपणच आपल्याला विचारला पाहिजे.

सर्वसामान्यांसाठी आपल्या लोकशाहीने काम केले पाहिजे, तरच रामराज्य निर्माण होईल, ही महात्मा गांधी यांची श्रद्धा होती आणि विश्वासही...! आता लवकरच राम मंदिर उभे राहील; पण गांधीजींच्या संकल्पनेतील रामराज्य साकार झालेले असेल का, की ते स्वप्नच राहील, हा प्रश्न आहे. अयोध्येत राम मंदिर उभे करण्याच्या देशव्यापी तयारीमुळे पुन्हा एकदा राम, रामायण आणि रामराज्य यांचे मंथन सुरू झाले आहे. भारताच्या विसाव्या शतकाच्या इतिहासात राम आणि रामराज्याचा विचार मांडणारा राजकीय नेता म्हणून आणि देशातील सर्वसामान्य लोकांना, अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्य चळवळीत मार्गदर्शन करणारा महात्मा म्हणून, आपण अर्थातच गांधीजींच्या नेतृत्वाकडे पाहतो. गांधीजींनी 'सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्रात आणि नंतर 'यंग इंडिया' आणि 'हरिजन' या त्यांनी सुरू केलेल्या नियतकालिकांत रामराज्याचा विचार मांडला आहे. गांधीजींनी मांडलेल्या रामराज्याची संकल्पना समजून घेताना, गांधीजींच्या व्यक्तिमत्त्वावर आणि विशेषतः त्यांच्या विचारविश्वावर रामनामाचा, रामायणाचा आणि संत तुलसीदास यांनी लिहिलेल्या 'रामचरितमानस' या ग्रंथाचा फार खोलवर परिणाम झाला होता, हे लक्षात घेतले पाहिजे. 'लहानपणी रंभा नावाच्या दाईने, आपल्याला भीती वाटत असेल, तर रामनामाचा जप करावा, असे सांगितले होते, त्यामुळे तो एक मोठा परिणाम माझ्यावर झाला,' असे त्यांनी आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. 'सत्याचे प्रयोग' वाचताना लक्षात येते, की गांधीजी हे सत्याचा शोध घेत निघालेले पांथस्थ आहेत आणि या सत्याच्या आधारेच ते राजकारण करू पाहतात. प्रस्तावनेत गांधीजींनी तसे स्पष्टपणे म्हटले आहे. ''जसजसा मी विचार करू लागतो, माझ्या भूतकालीन जीवनावर दृष्टी टाकीत जातो, तसतसे माझे अल्पत्व मला स्पष्टपणे दिसून येते. मला जे करावयाचे आहे, ज्याच्यासाठी आज तीस वर्षे माझी धडपड चालली आहे, ते तर आत्मदर्शन, ईश्वराचा साक्षात्कार, मोक्ष हेच होय. माझी सर्व हालचाल याचदृष्टीने होत असते, माझे सर्व लिखाण यादृष्टीने चालते आणि राजकीय चळवळीतही मी मनोभावाने पडतो तोही याचसाठी.'' देशभक्त गोपाळकृष्ण गोखले हे गांधीजींचे गुरू. त्यांच्याकडून सदाचारी राजकारणाची आणि राजकारणाच्या अध्यात्मीकरणाची वैचारिक भूमिका गांधीजींनी स्वीकारली आणि त्याचे पडसाद त्यांच्या विविध आंदोलनांत उमटले. गांधीजींच्या रामराज्याच्या मूळ संकल्पनेमागे अध्यात्मीकरण आणि नीतीमय राजकारणाचा आग्रह, हे दोन मूलभूत आधार स्पष्टपणे दिसतात.

## निष्कर्ष

प्रस्तूत शोधनिबंधातून असा निष्कर्ष निघतो की, महात्मा गांधींना सर्वसामान्य लोकांचं राज्य मान्य होते. गांधीजींचे रामराज्य म्हणजे सर्वसामान्य माणसाचा सर्वांगीण विकास त्यांना अभिप्रेत होता. राम राज्याच्या संकल्पनेतून कल्याणकारी राज्य ही संकल्पना मांडण्याचा प्रयत्न केला गेला आहे. रामराज्याच्या संकल्पनेतून ग्रामस्वराज्याची, संकल्पना विश्वस्तांची कल्पना आणि भारतीयांचं कल्याण होईल हे या शोध-निबंधातून सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे. वरील प्रमाणे रामराज्य आणण्यासाठी भारतीय शासन प्रयत्नशील असल्याचेही सांगण्यात आलेले आहे. राम राज्याच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्ती स्वावलंबी बनावा. जे आज नरेंद्र मोदी आत्मनिर्भर भारताची संकल्पना सांगत आहे. ती महात्मा गांधीजींच्या रामराज्याशी मिळती जुळतीअसल्याचे दिसून येते. हाच निष्कर्ष या शोध प्रबंधातून स्पष्ट होताना दिसून येतो.

**संदर्भ सुची**


- भारतीय राजकीय विचारवंत - भा .ल. भोळे
- भारतीय राजकीय विचार - बाबासाहेब मोताळे
- आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत - वा. भा.पाटील
- दै.लोकसत्ता
- माझे सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
- हरिजन - महात्मा गांधी
- पाश्चिमात्य आणि भारतीय राजकीय विचारवंत - प्रभा कस्तूरे
- महात्मा गांधींची - यशवंत सुमंत
- इंटरनेट